मराठवाड्यातील बेरोजगारीचे अध्ययन विशेष संदर्भ नांदेड जिल्हा.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड मानव्य विधाशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पी.एच.डी.पदवी संपादन करण्याकरिता सादर करण्यात येणारा संशोधन आराखडा.

संशोधक

रविंद्र प्रकाश वाघमारे.

एम.ए.(अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.एस.डी.स्वामी..

एम.ए.एम.फिल पि.एच.डी

श्री.दत्त,कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,हदगांव

संशोधन केंद्रे

सामाजिकशास्त्रे विद्या संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यपीठ,नांदेड.

डिसेंबर 2022

प्रस्तावना

मराठवाडा विभाग हा विविध कारणासाठी महाराष्ट्रातील एक महत्वाचा प्रशासकिय विभाग असुन या विभागामध्ये एकूण 8 जिल्हाचा समावेश होतो. तो पुढील प्रमाणे आपणाला सागता येईल. 1) औरंगाबाद, 2) जालना, 3) परभणी 4) उस्मानाबाद 5) लातुर 6) बीड 7) हिंगोली 8) नांदेड.

यामध्ये विशेष संदर्भ नांदेड जिल्हा यावर माझे संशोधन असुन तो औरंगाबाद या विभागातील एक महत्वाचा जिल्हा आहे.आणि या जिल्हामध्ये एकूण 16 तालुके आहेत. 1) अर्धापूर, 2) भोकर , 3) बेलोली 4) देगलूर 5) धर्माबाद 6)हदगाव 7) हिमायतनगर 8) कंधार 9) किनवट 10) लोहा 11) माहूर 12) मुदखेड 13) मुखेड 14) नांदेड 15) नायगाव 16) उमरी.

नांदेड शहर हे महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागात असलेला आणि नांदेड जिल्हाल्याचे प्रशासकीय मुख्यालय आहे. या शहराला ऐतिहाषिक आणि धार्मीक वारसा लाभलेला आहे.

नंदागिरी उर्फ नंदीग्राम व प्राचीन किल्याच्या नावावरून या शहराला प्रथम नंदीग्राम आणि कालांतराने अपभ्रंश होऊन नांदेड हे नाव पडले असल्याचे सांगण्यात येते.

नांदेड जिल्हाने साक्षरतेचे प्रमाण 65% येवढे आहे. लोकसंख्या 5.50,439 (80) (2011) नुसार आहे. आणि भाषा ही मराठी बोलली जाते.

नांदेड जिल्हामध्ये वाढत असलेली बेरोजगारी आणि या ठिकाणावरील उपलब्ध नसलेला औद्योगिक वसाहती नसल्यामुळे मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी पाहायला आपणास मिळतो. दुसरे कारण आपणाला असे सांगता येईल कि शेतीचा विकास आपणाला बघायला मिळत नाही, तिसरे

कारण शिक्षणामध्ये तेवढा विकास झालेला आपणाला पाहावयास मिळत नाही सध्याला 65 % बघायाला मिळते आणि ज्यास्त प्रमाणमध्ये औद्योगिक शिक्षण घेताणा विद्यार्थी बगायला मिळत नाही. औद्योगिक शिक्षण घेताना विद्यार्थी बगायला मिळत नाही. गावामध्ये शासणाच्या योग्य त्या योजना राबविलया त्यात नविन आणि त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भष्ट्रचार आहे तो आपणाला पाहावयाय मिळतो. कौशल्याधारिस शिक्षणाचा येथे आपणाला अभाव हा पाहावयास मिळतो.

बेरोजगारी म्हणजे काय ?

साधारपणे ज्याला उत्पादक्रिय प्रक्रियत कोणताही लाभ घेत नाही त्यास बेरोजगारी असे म्हणतात अर्थशास्त्र बेरोजगारी ही या संदर्भात अभ्यासता येतो.

अ) कामाचे स्वरुप

ब) काम करणारा वयोगट

क) श्रमाची मागणी व पुरवठा

ड) प्रचंलित वेतन दर.

वाढत्या श्रमाचा वेग या संदर्भात अभ्यासता येतो. त्यामुळे आर्थिक दृष्टीचा दर पुरेसा वेगवान नाही.

बेरोजगारीचा अर्थ असा की, ज्या परिस्थिती 15 ते 59 वयोगटातील व्यक्तीना प्रचलित वेतनदरावर काम करण्याची इच्छा व पात्रता असुनही रोजगार मिळत नाही.

एका व्यक्तीस रोजगार असणे म्हणजे ती व्यक्ती आठवड्यातील किमान काही तास काम करत असली पाहीजे राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेच्या (N.S.S.O) यांचीकीय माहीतीनुसार.

1) भारतात एखादी व्यक्ती दर आठवड्याला 14 तासपेक्षा कमी काम करते अशा व्यक्तीस बेरोजगार म्हणतात.
2) किमान 15 ते 28 तास दर आठवड्याला काम करतात त्यांना न्युन रोजगार म्हणतात.
3) किमान व्यक्ती दररोज आठ तास म्हणजे प्रत्येक वर्षाला 273 दिवस काम करते त्यांना रोजगार असलेल्या व्यक्ती म्हणतात.

बेरोजगारीची प्रकार :- 1) ग्रामीण शहरी

1) अनौच्छिक बेरोजगारी 1) हंगामी/बेरोजगारी औदयोगिक
2) ऐच्छिक बेरोजगारी 2) छुपी बेरोजगारी
3) अर्धबेकारी प्रछन्ना
4) पूर्ण रोजगार बेरोजगारी

तांत्रिक संघर्षजन्य चक्रीय संरचनात्मक
बेरोजगारी

संशोधनाची उदिष्टये :-

1) मराठावाड्यातील आर्थिक विकासाचा अभ्यास करणे.
2) नांदेड जिल्हातील आर्थिक विकासाचा अभ्यास करणे.
3) मराठावाड्यातील बेरोजगारीचा अभ्यास करणे.
4) नांदेड जिल्हातील बेरोजगारीचा अभ्यास करणे.
5) मराठावाड्यातील विविध आर्थिक विकासाचा अभ्यास करणे.
6) नांदेड जिल्हातील विविध आर्थिक विकासाचा अभ्यास करणे.

समष्या सुत्रण :-

महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर महाराष्ट्र राज्याचा,सामाजिक, आर्थिक, वाहतुक व दळणवळण, शैक्षिणक,आरोग्य,विदयुत,सेवाक्षेत्रात व उद्योग क्षेत्रात बऱ्याय प्रमाणात प्रगीती झालेली आहे.राज्याच्या आर्थिक विकसाबरोबर सेवा योजना क्षेत्रात बदल होणे आपेक्षीत आहे.विविध क्षेत्रातील बदला पैकी काही इष्ट बदल व काही बदल अनिष्ठ आहेत का? झालेली बदल आर्थिक विकासाला पुरक आहे का ? आर्थिक विकासाबरोबर मराठवाड्यातील व नांदेड जिल्हायतील बदल

इष्ट आहेत की नाही ? मराठवाड्यातील बेरोजगारीच्या प्रमाणत,घट झाली का वाढ झाली ? नांदेड जिल्हातील बरोजगारीच्या प्रमाणात घट झाली का वाढ झाली का ? या सर्व प्रश्नाचा शोध घेणे हा अध्ययनाचा मुख्य हेतू आहे.

संशोधणची गृहीते :-

1) मराठवाड्यातील बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे.
2) नांदेड जिल्हातील बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे.
3) मराठवाड्यात शासकीय योजनेमुळे बेरोजगारी कमी झाली आहे.
4) नांदेड जिल्हातील शासकीय योजनेमुळे बेरोजगारी कमी झाली आहे.

संशोधन अध्ययन पध्दत :

प्रस्तुत विषयाचा पूर्व अकलन उपलब्ध नसल्यामुळे या संशोधणासाठी व्दितीय साधन साम्रगीचा वापर करून अन्वेषणात्मक संशोधन पध्दती वापरली जाणार आहे. अन्वेषणात्मक संशोधन पध्दत म्हणजे ज्यावेळी एखाद्या घटनेचे स्वरुप किंवा त्या घटनेसंबंधीची वस्तुस्थिती तिच्या मुळाशी असणारी कारणे, त्या घटनेचे परिणाम इत्यादी बाबीचा वस्तुनिष्ठ दुष्टिने शोधुन काढून केलेले अध्ययन होय.

दुय्यम साधन सामग्री :-

दुय्यम साधन सामग्रीव्दारे माहीती गोळा करण्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथ, पत्रसंग्रह, मासिक, नियतकालिके,वर्तमानपत्र, मुलाखात, इंटरनेट इत्यादी साधनांव्दारे माहिती गोळा करुन प्रस्तुत विषयाचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

संशोधनाची साधने

संशोधन पूर्णत्वास नेण्यासाठी त्याला आधाराची गरज असते.यासाठी संदर्भसाहीत्य वापरण्यात येणार आहे.

1) **लिखित साधणे**:- लिखित साधणामध्ये प्रकशित पुस्तके, मासिके, साप्ताहिके, दैनिके इत्यादीचा अभ्यास करण्यात येणार आहे.तसेच नांदेड जिल्हातील सामाजिक आर्थिक स्थिती व आर्थिक समालोचन.मराठवाडयतील आर्थिक पाहणी अहवाल जनगणना अहवाल, वाढती लोकसंख्या अहवाल, केंद्रे व राज्याशासनाच्या अभ्यास पत्रिका व विविध योजना विषयक पुस्तके जिल्हा नियोजन मंडळाचे बेरोजगारी विषयक अहवाल साहित विविध पुस्तकाचा अभ्यास करण्यात येणार आहे.
2) **इंटरनेट सामुग्री**, संशोधनाच्या, अनुषगाने गुगलव्दारे काही माहितीचा शोध घेण्यात येणार आहेत बदलत्या काळानुसार आलेल्या डिजिटल मीडियाच्या माध्यमातून काही माहिती गोळा केल्या जाईल.

प्रकरणाची रचना

प्रस्तुत प्रबंधात पुढील प्रकरणांचा समावेश असणार आहे

प्रकरण पहिले :-

प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये विषयाचे महत्व,अभ्यास पध्दती उद्देश संकल्पाना मर्यादा व पूर्ण संशोधन साहित्याचे पुनर्वीलोकन करण्यात येईल.

प्रकरण दुसरे :-

नांदेड जिल्हाचा सामाजिक आणि आर्थिक विकासाचा अभ्यास करण्या येईल.

प्रस्तुत प्रकरणामध्ये नांदेड ,जिल्हाचा इतिहास, जिल्हाची एकूण पार्श्वभूमी लोकसंख्या साक्षरतेची प्रमाण , शैक्षणिक बदल, धार्मिक बदल औघीमिक परिणाम,दळणवळणाची साधणे आदिमी विस्तुत मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे

नांदेड जिल्हातील बेरोजगारीचा अभ्यास करण्यात येईल .

पुस्तुत प्रकरणामध्ये नांदेड जिल्हातील बेरोजगारीची स्थिती ,बेरोजगारी, कोण-कोणती बेरोजगारी आहे त्याचा अभ्यास (उदा.मौसमी बेरोजगारी, सहमाही, हंगामी) इत्यादी रोजगारासाठी

स्थलंतार व्यवसायीक स्थलांतरण, आर्थिक विकास साधणे, शैक्षणिक बदल धार्मिक बदल, याबाबत विस्तारपूर्वक मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे :

बेरोजगारी विषयक शासनाने राबिवलेल्या विविध योजनेचा झालेला परिणाम यांचा अध्ययन

प्रस्तुत प्रकरणामध्ये नांदेड जिल्हात बेरोजगार तरूणासाठी शासनाने ज्या काय योजना राबिवल्या आहेत त्यांचा नेमका काय परिणाम झाला त्यांचे फायदे व तोटे यांचा अभ्यास करण्यात येईल . उदा - महात्मा गांधी रोजगार हमी योजना.

प्रकरण:- **5 वे**. **निष्कर्ष व शिफारशी**.

या प्रकरणामध्ये प्रथम प्रत्येक प्रकरणाचा सारांश देवुन नंतर ठळक निष्कर्ष मांडण्यात येणार आहेत. तसेच उपायोजना करण्यात येतील.

टिप : संशोधनादरम्यान प्रस्तुत प्रबंधामध्ये आवश्यक तो बदल होऊ शकतो.

संशोधन विषयाच्या मर्यादा व व्याप्ती

प्रस्तुत विषय सशोधणाचे क्षेत्र मराठवाड्यातील नांदेड जिल्हात आहे. त्यामुळे संशोधणाच्या मर्यादा या केवळ नांदेड जिल्हातील वाढती बेरोजगारी मग ती सुशिक्षीत व अशिक्षिती बेरोजगारीचा विचार हा यामध्ये करण्यात येणार आहे.याशिवाय मराठवाडयातील बेरोजगाराचा धावता ढोबळ मानाने अभ्यास करण्यात येईल.आणि नांदेड जिल्हातील बेरोजगारीचा संध्या आढावा हा देखील घेण्यात येईल. हे अध्ययन करत असताना त्यांची कालमयादा म्हणून 2001 ते 2021 पर्यंतच्या कालखंडाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

अध्ययनाचे महत्त्व

मराठवाडा हा विभाग अतिशय मागास आहे आणि त्यामध्ये नांदेड हा जिल्हा असुण नांदेड मध्ये आपणाला अनेक प्रकारच्या बेरोजगारीच्या समस्या घ्या आपणाला भेड सावत आहेत आणि त्या संदर्भामध्ये संशोधण निर्माण करण्यात येणार आहे.

नांदेड जिल्हा हा सामाजिक, आर्थिक शैक्षणिक सांस्कृतिक व राजकीय दृष्टया आपणाला अतिश मागास असलेला पाहावयाचा मिळतो.म्हणून नांदेड जिल्हामध्ये आपणला बेरोजगारी झ ाालेली पाहावयास मिळते.

कालखंड (2001-2021)

मराठवाड्यातील व नांदेड जिल्हातील बेरोगारी विषयक अध्ययनाचा कालखंड हा 2001-2021 घेण्यात येईल.

संदर्भ ग्रंथसुची

1) एन.सी.सक्सेना समिती आढावा.(21ऑगस्ट 2009 .)

2) सुरेश तेडुंलकर समिती आढावा. (2009)

3) सी. रंगराजन समिती आढावा. (जून 2012.)

4) भारतीय रुपया व त्यांचे अवमुल्य - डॉ.बाबासाहेब आंबेडकर

5) द.प्रॉब्लेम ऑफ रुपी . (1923) डॉ.बाबासाहेब आंबेडकर

6) राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालय यांचा आढावा घेण्यात येईल.

7) केंद्रीय सांख्यिकी कार्यालय यांचा आढावा घेण्यात येईल.

8) अल्फेड मार्शल (1890) प्रिन्सीपल ऑफ इकॉनामिक्स.

9) डॉ.चतुरवेदी (1 जानेवारी 2018) भारत आर्थिक विकास व निती.किताब महल प्रकाशन.

10) जान मेनार्ड कीन्स (1936) रोजगार व्याज व मुद्राचा सामान्य सिध्दांत.

11) डॉ.जे.पी. मिश्रा (1 जानेवारी 2021).व्यष्टी अर्थशास्त्राचे सिध्दांत साहित्य भवन प्रकाशन.

12) टि.डी. लडकवाला समिती (1993)

13) विविध विद्यापिठामध्ये प्रकाशित झालेली बेरोजगारी विषयक संशोधणाचा आढावा घेण्यात येईल.

14) केद्रीय आणि राज्य सांख्यिकी संस्थांची परिषद- प्रथम 1971 मध्ये या मधून माहिती घेण्यात येईल.

15) महाराष्ट्र राज्याचा रोजगारविषयक अहवाल या मधून माहिती घेण्यात येईल.

16) भारतीय अर्थशास्त्र या पुस्तकामधुन आढावा घेण्यात येईल.

17) रार्ष्टीय बेरोजगारी विषयक प्रकाशित विविध साहित्याचा आढावा घेण्यात येईल.

उदा.मिडीया,वर्तमानपत्र,नियत कालिके,पाक्षिक वार्षिक यांचा आढावा घेण्यात येईल.

संशोधक

रविंद्र प्रकाश वाघमार

सामाजिकशास्त्रे विद्या संकुल स्वामी
रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यपीठ,नांदेड

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.एस.डी.स्वामी.

श्री.दत्त,कला,वाणिज्य,व विज्ञान
महाविदयालय, हदगांव